33

# संतसाहित्य : समाज आणि संस्कृती

**प्रा.डॉ. भगवान दिरंगे,**
मराठी भाषा व वाङ्मय विभाग प्रमुख,
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर
जि.जालना. - (४३१५०३)

मराठी भाषेच्या सुरुवातीच्या काळातील महत्वाचे साहित्य म्हणून संतसाहित्य ओळखल्या जाते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात संतसाहित्याचे योगदान फार मोठे आहे. साहित्य, कला आणि धर्म यांचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाशी अतुट नाते असते. या नात्याचा अंतर्गत संबंध आपण शोधला तर आपणास साहित्याच्या प्रेरणांचे स्वरुप लक्षात येऊ शकते.

" बाराव्या शतकाच्या आधीचा काळ पाहिला, तर राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांत महाराष्ट्राचा खास वेगळेपणा तितका स्पष्ट दिसून येत नाही. तत्कालिन शिलालेखांतून संस्कृत किंवा कानडी भाषेचा वापर आढळतो व मराठी भाषा क्वचित कोठे कोठे डोकावताना दिसते. म्हणूनच राष्ट्रकुट, चालुक्य वगैरे राजवंशांना कानडी म्हणावयाचे की, मराठी मानायचे हा प्रश्न अजून अनिर्णीतच आहे. सन ११५० पूर्वीचे अवघे सातच मराठी शिलालेख उपलब्ध आहेत. देवगिरी येथील यादवांच्या काळापासून मात्र मराठी शिलालेखांची संख्या वाढत गेली, व कालांतराने झाडिमंडळातील मरहट्ट्यांच्या बोलीला राजभाषेचे ऐश्वर्य लाभले."१

यादव काळापासून पुढे खऱ्या अर्थाने मराठी भाषेच्या प्रतिष्ठेचा काळ सुरु झाला या काळामध्ये स्वभाषेचा अभिमान राज्यकर्त्यांमध्ये आणि धर्म प्रवर्तकांमध्ये निर्माण झाल्याचे आपल्या लक्षात येते. मराठी भाषेची रसवत्ता आणि गुणवत्ता सिध्द करण्याचा प्रयत्न चक्रधर स्वामी आणि पुढच्या काळात संत ज्ञानेश्वरांनी केला.

"तव श्रोते म्हणती दैव | कैसी बोलाची हवाव |
काय नादातें हन बरव | जिणोनि आली || १३२ ||
हां हो नवल नोहे देशी | मऱ्हाटी बोलिजे तरी, ऐसी |
वाणे उमटाताहे आकाशी | साहित्य रंगाचे || १३३ || " - २

'मराठी भाषेचे महत्व श्रोत्यांना वाटल्यामुळे श्रोते म्हणतात आमचे महत्भाग्य आहे. मराठी भाषा किती सुंदर आहे ती सप्तसुरांचा कोमलपणा जिंकून आली आहे असे वाटते. ही भाषा अशी बोलावी की, बोलल्या बरोबर आकाशात उपमालंकारादी साहित्याचे नानारंग उमटलेले दिसतील.' असा सार्थ अभिमान ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या श्रोत्यांना वाटत होता. या वरुन मराठी भाषेचे सामर्थ्य आणि रसतत्व तत्कालिन संतांना आणि जाणकार श्रोत्यांना जाणवल्याचे दिसते.

" महाराष्ट्रावर परचक्र आले, तरी मराठी माणूस संत वाङ्मयाचे स्फूर्तीस्थान असलेल्या ज्ञानेश्वर माऊलींना व ज्ञानेश्वरीला विसरला नाही. एवढेच नाही तर याच तत्वज्ञानाने सहिष्णूवृत्ती, संयमीवृत्ती समाजात रुजविली व लोकांच्या ह्रदयातील आळासाचा, विषयलंपटतेचा पडदा दूर केला. हा पडदा दूर होताच महाराष्ट्रावर आलेल्या परकीय आक्रमणाविरुध्द मराठे लढण्यास सिध्द झाले " ३

या वरुन आपणास ठामपणे म्हणता येते की, भाषेचा अभिमान जागृत झाल्यावर सामान्य माणसाला स्वत:ची एक सांस्कृतिक ओळख निर्माण होते, एकसंघ सामाजिक जाणीव निर्माण होते. समाजाच्या आणि संस्कृतीच्या रक्षणार्थ सामान्य माणूस लढण्यास सिध्द होतो.

ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला त्या काळात महाराष्ट्रात दत्त संप्रदाय, महानुभाव संप्रदाय आस्तित्वात होते. परंतु भागवत संप्रदायाने आपले वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले. पंढरपूरचा विठ्ठल या सांप्रदयाचे दैवत. या दैवतामध्ये शैव आणि वैष्णव सांप्रदायाचा समन्वय झालेला दिसतो. सांप्रदायिक, जातीय भेदाभेदापलिकडे जाऊन संतानी सर्व समावेशक समतावादी विचार समाजात रुजविले म्हणून समाजात एकसंघ भावना निर्माण झाली. भागवत सांप्रदायात समाजाच्या सर्वच स्तरातील लोक सहभागी झाले. स्त्री - शुद्रादी घटकही या भक्ती चळवळीत संमिलित झाले. आध्यात्मिक पातळीवर समानतेचा अनुभव या सर्वांना आला. माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली. संतानी पांडूरंगाशी आपला सुखदू:खात्मक संवाद केला. पांडूरंगाशी हितगुज केले. आई, गुरु, बंधू, सखा, पिता अशी नाती निर्माण केली. हा भावबंध भक्तमंडळीमध्ये सुध्दा संक्रमीत झाला. हा भक्तीभाव महाराष्ट्राचा स्थायी धर्म झालेला दिसतो.

मध्ययुगात मुसलमानी आक्रमणामुळे समाज पिचला गेला होता. देवगिरीच्या यादवांची राजवट उतरणीला लागली होती. या सर्व घडामोडींपासून संत अलिप्त नव्हते. समाजजीवनातील चैतन्य हरवले होते. अशा समाजमनाला प्रेरणा देण्याचे काम संतानी केले. समाजाच्या पारमार्थिक उन्नयनासाठी संतांनी केलेले कार्य निश्चीतच प्रेरक आहे. संतांनी निर्माण केलेली ही भक्तीची चळवळ आजही समाजात प्रभावशाली आहे.

"वारकरी चळवळ एवढी प्रभावशाली ठरण्याचे कारण म्हणजे अधिकारहीन गरीब लोकांचा तिला पाठींबा मिळाला होता त्यातूनच तिने कायदेकानून तयार केले; त्याशिवाय या चळवळीने तात्कालिक स्वरुपाचे जाहिरनामे घोषित करण्याचेही टाळले; कारण अशा जाहिरनाम्यांचे पालन करणे तिच्या गोरगरीब अनुयायांना शक्य नव्हते. कृतीशिल राजकारणाशी ही चळवळ जशी अंतर राखून राहिली, तसेच कोणत्याही राजकीय घडामोडीवर प्रत्यक्ष भाष्य करण्याचेही तिने टाळले ; मग त्या मुसलामानी सत्तेशी संबंधित असो. ही चळवळ नेहमीच सर्व समावेशक उदारमतवादी राहिली. शुद्रांची चळवळ असूनही तिने आपल्या कवेत येणारे ब्राह्मण, मुसलमान आणि अस्पृश्य या सर्वांचा आदर केला. " ४

मध्ययुगीन मराठी साहित्यातील संत साहित्य हा महत्वाचा प्रवाह आहे. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतच्या संतानी अभंग, विराण्या, भारुड, गवळणी, ओव्या आदी प्रकारात जे साहित्य निर्माण केले त्यातून भक्ती बरोबरच समता हे मूल्य सुद्धा जोरकसपणे मांडले. मराठी वाङ्मयाच्या सुरुवातीच्या अवस्थेत या साहित्याने कसदार निर्मिती तर केलीच परंतु जनमानसावर जबरदस्त पकड निर्माण केली. अद्यापही तो प्रभाव टिकून आहे.

**संदर्भ :-**

१. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती : गं.बा. सरदार पृ. क्र. १६

२. ज्ञानेश्वरी : संत ज्ञानेश्वर - अध्याय ६ वा - ओवी क्र. १३२ - १३३

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्रा. डॉ. मोहन शेळके - पृ.क्र. ८१

४. टिकास्वयंवर : भालचंद्र नेमाडे - पृ.क्र. ३१, ३२